## जाहीर निविदा

पोलीस अधिक्षक कार्यालय व त्यांचे अधिपत्याखालील उपविभागीय उपविपोअ कार्यालये व पोलीस ठाणे येथील खाली नमुद केलेल्या शार्प/कॅनॉन/रिको कंपनीच्या झेरॉक्स मशीन टोनर देखभाल व दुरुस्तीची कामे सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षामध्ये करुन घेणेकरीता वार्षिक दरपत्रके मागविण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालयातील विविध शाखा, तसेच कार्यालयाचे अधिपत्याखालील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये व पोलीस ठाणे येथील ४९ नग शार्प / कॅनॉन / रिको झेरॉक्स मशीनचे झेरॉक्स मशीन टोनर देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकरीता सातारा शहरातील जे कोणी अधिकृत ठेकेदार अशा प्रकारच्या देखभाल व दुरूस्तीची कामे उधारीवर (क्रेडिटवर) करुन देण्यास इच्छुक असतील त्यांनी सिलबंद दरपत्रक दिनांक१३/ ९ /२०२२ रोजी पर्यंत पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा यांचे कार्यालयातील नोंदणी शाखेमध्ये देणेत यावीत . तसेच दरपत्रकामध्ये खालील शर्ती व अटी नमूद असणे आवश्यक आहे.

अ) कार्यक्षेत्र

**१. पोलीस अधीक्षक सातारा कार्यालय व त्यांचे अधिपत्याखालील सर्व शाखा, मुख्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील खालील नमुद एकुण ४९ नग मशिनः-**

पत्रव्यवहार शाखा ,आस्थापना शाखा ,अर्जशाखा ,वाचक शाखा ,स्विय सहाय्ययक पो.अ.,मोटार परिवहन विभाग ,बिनतारी संदेश विभाग ,पोलीस नियंत्रण कक्ष,उविपोअ सातारा विभाग ,उविपोअ कोरेगांव,उविपोअ फलटण विभाग उविपोअ वाई विभाग ,उविपोअ कराड विभाग ,उविपोअ पाटण विभाग ,उविपोअ दहिवडी विभाग ,सातारा शहर पोलीस ठाणे ,सातारा तालूका ,कोरेगांव पोलीस ठाणे ,बोरगांव पोलीस ठाणे ,रहिमतपूर पोलीस ठाणे ,वाई पोलीस ठाणे ,मेढा पोलीस ठाणे ,स्थागुशा ,लेखाशाखा पाचगणी पोलीस ठाणे ,महाबळेश्वर पोलीस ठाणे ,भूईंज पोलीस ठाणे फलटण शहर पोलीस ठाणे ,फलटण ग्रामीण ,लोणंद पोलीस ठाणे ,खंडाळा पोलीस ठाणे ,वाठार पोलीस ठाणे ,दहिवडी पोलीस ठाणे ,वडूज पोलीस ठाणे ,म्हसवड पोलीस ठाणे ,पुसेगांव पोलीस ठाणे ,औंध पोलीस ठाणे ,कराड शहर पोलीस ठाणे ,कराड तालूका पोलीस ठाणे ,तळबीड पोलीस ठाणे ,उंब्रज पोलीस ठाणे ,पाटण पोलीस ठाणे कोयनानगर पोलीस ठाणे ,ढेबेवाडी पोलीस ठाणे ,शाहुपूरी पोलीस ठाणे, शिरवळ पोलीस ठाणे ,जिविशा ,वाचक पोलीस अधीक्षक, पत्रव्यवहार शाखा

**ब) कामाचे स्वरुप :-**

१. उपरोक्त (अ) मध्ये नमुद कार्यक्षेत्रातील झेरॉक्स मशिनची प्रत्येक महिन्यात देखभाल करणे. आवश्यकतेनुसार दुरुस्ती करणे, सुटे भाग पुरवठा करणे तसेच टोनर रिफिलींग करुन पुरवठा करणे. सोबत झेरॉक्स मशिनचा मेक, संख्या याबाबतची माहिती सोबतचे परिशिष्ट १ मध्ये देण्यात आली असून त्या सर्व मशिन्सची देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक राहिल. परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या झेरॉक्स मशिनच्या संख्येत कमी/अधिक प्रमाणात बदल होऊ शकतो.

२. झेरॉक्स मशिनच्या देखभालीकरीता आवश्यक ती सामग्री उपलब्ध करुन देणे.

३. झेरॉक्स मशिन्स ज्या ठिकाणी उभारणी (Installed) केली आहेत त्या ठिकाणी करणे आवश्यक आहे.

४. दुरुस्तीकरीता मशिन एक दिवसापेक्षा जास्त दिवस कार्यशाळेत नेहणे आवश्यक असल्यास सदर मशिनऐवजी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

५. मशिन दुरुस्तीकरीता कार्यशाळेत ने-आण करणेकरीता कंपनीने त्यांचे स्वःखर्चाने व्यवस्था करावी लागेल.

**क) अटी व शर्ती**

१. दरपत्रकासोबत सादर करणारी व्यावसायिक कंपनी ही अधिकृत विक्रते स्थानिक असल्यास प्राधान्य दिले जाईल.

२. सदर कामाकरीता अनुभवी व प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता व अनुभवाचा तपशिल दरपत्रकासोबत सादर करण्यात यावा.

३. दरपत्रके सादर करण्या-या कपंनीने त्यांची Registrar of Companies यांचेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र, विक्री कर, पॅन नंबर, सेवाकर व आयकरासंबंधीची सांक्षाकित केलेली आवश्यक ती कागदपत्र दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक राहील.

४ दरपत्रके सादर करणा-या दरपत्रक धारकाने शार्प/कॅनॉन/रिको या पैकी एका कंपनीचे अधिकृत सेवा पुरवठादार (Authorised Service Provider) असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

५. कार्यालयाकडे पूर्वी समाधानकारक काम केलेल्या कंपनीने दरपत्रकेव्दारे प्राप्त झालेल्या किमान दराने काम करण्यास तयार असतील, तर त्यांची दरपत्रके मंजूर करण्याचा अधिकार कार्यालय राखून ठेवीत आहे.

६. कामाच्या अनुषंगाने कार्यालयातील कामकाजाशी संबधित अधिकारी यांचेशी योग्य समन्वय टेवणे, सहकार्य करणे व त्यांच्या सूचनांचे पालन करुन काम पूर्ण करणे बंधनकारक राहील.

७. मशिन्सचे तक्रारीबाबत कळविल्यानंतर २४ तासाचे आत त्याचे निवारण करणे आवश्यक राहील. तसे न झाल्यास करार रकमेच्या १% दंड त्यांना देय होणा-या रकमेतून वसुल करण्यात येईल.

८. सदर दरपत्रकातील अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याचे अधिकार तसेच दरपत्रक प्रक्रियेतील काही भाग अथवा पूर्ण दरपत्रक प्रक्रिया कोणतेही कारण नमूद न करता अगर पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार कार्यालय राखून ठेवीत आहे.

९. कार्यालयास सर्वात कमी दराची दरपत्रक मान्य करणे बंधनकारक असणार नाही. कार्यालयाचे कामकाजाच्या हितासाठी अन्य यथोचित दरपत्रके मंजूर करण्याचे अधिकार कार्यालयास राहतील.

१०. प्रस्तुतचा करार हा दरपत्रके स्विकृत झालेल्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीकरीता राहिल. मंजूर दरपत्रक धारकास दरपत्रक मंजूर झाल्यापासून १० दिवसांचे आत कार्यालयाशी दरपत्रकेतील अटी व शर्ती तसेच कार्यालयास व मंजूर दरपत्रके धारकास मान्य होतील अशा अटी व शतीवर करारनामा करावा लागेल.

११. दरपत्रक फी रक्कम रु.५००/- कार्यालयात रोखीने जमा करणे आवश्यक राहील.

१२. दरपत्रकासोबत बयाणा रक्कम म्हणून रु.१००००/- राष्ट्रीयकृत बँकेमधील धनाकर्षद्वारे Personal Assistant to Supdt. Of Police, satara city या नावे जोडणे आवश्यक राहिल.

१३. मंजूर पुरवठाधारकास मंजूर दरपत्रक रकमेच्या ५ टक्के अनामत रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅन्केची Bank Gurantee अथवा धनाकर्षाने जमा करावी लागेल.

१४. कोणतीही दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचा अधिकार पोलीस अधीक्षक, सातारा यांचेकडे राहील व तो सर्वांना ग्राह्य धरावा लागेल.

**ड) दरपत्रक दाखल करण्याची कार्यपध्दती :-**

१. दरपत्रके मोहोरबंद लिफाफा पध्दतीने दाखल करावयाचे असून तांत्रिक लिफाफा नं.१ मध्ये कंपनीची माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावयाची असून मुख्य लिफाफा(दरपत्रक) नं.२ मध्ये दरपत्रक सादर करणे आवश्यक राहील. सदर दोन्ही लिफाफे सिलबंद करून त्यावर अनुक्रमे **"झेरॉक्स मशिन करीता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार निविदा लिफापा नं.१" "झेरॉक्स मशिन करीता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार निविदा मुख्य लिफाफा(दरपत्रक) नं.२"** असे नमुद करुन दोन्ही लिफाफे कार्यालयात निर्धारित केलेल्या कालावधी व वेळेपूर्वी विहित पध्दतीने पोलीस अधीक्षक सातारा या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात

२ लिफाफा नं.१ मध्ये खालीलप्रमाणे माहिती सादर करावी.

| | | |
|---|---|---|
| १ | व्यावसायिकाचे नाव | |
| २ | पत्ता | |
| ३ | नोंदणी क्र. | |
| ४ | भागीदारांची नावे व पत्ता(असल्यास) | |
| ५ | निविदे संबधी संपर्क साधावयाच्या व्यक्तीचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | |
| ६ | पॅन क्रमांक | |
| ७ | आयकर भरल्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| ८ | दुरध्वनी क्रमांक | |
| ९ | ई-मेल | |
| १० | फॅक्स क्रमांक | |
| ११ | झेरॉक्स मशिनच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीबाबतचा शासकिय /निमशासकिय/ खाजगी कार्यालयातील कामाचा अनुभव आवश्यक त्या कागदपत्रांसह (कामाचे स्वरुप व कालावधी) | |
| १२ | विशेषज्ञ व अनुभवी कर्मचाऱ्यांची संख्या | |
| १३ | बयाणा रकमेचा तपशिल(धनाकर्ष क्र. व दिनांक /रक्कम रु.) | |

३. लिफाफा नं.२ मध्ये खालीलप्रमाणे माहिती सादर करावी.

| कामाचे नांव | विहित केलेला दर रु. प्रति झेरॉक्स मशिन |
|---|---|
| **वार्षिक सेवासंविदा दरकरार** | |
| झेरॉक्स मशिन (स्पेअरपार्टसह Comprehensive)<br>सेवा शुल्क<br>एकूण | रु.<br>रु.<br>रु. |
| झेरॉक्स मशिन(विनास्पेअरपार्ट Non-Comprehensive)<br>सेवाशुल्क<br>**एकूण शुल्क** | रु.<br>रु.<br>रु. |
| टोनर रिफिलिंग<br>मेक –<br>1. Sharp AR 5620<br>2. Canon / Ir 2530<br>3 Canon / Ir 2422 L<br>4. Ricoh MP 3054 | <br><br>रु.<br>रु.<br>रु<br>रु |

४. उपरोक्त नमुद केलेल्या पध्दतीने सादर न झालेल्या दरपत्रके नाकारण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

५. दरपत्रकेतील प्रत्येक पान हे कंपनीने अधिकृत केलेल्या अधिका-याने स्वाक्षरीत करणे आवश्यक राहील.

६. ज्या व्यावसायिक कंपनीची तांत्रिक निविदा तांत्रिकदृष्टया पात्र असलेची पडताळणी झाली असेल त्यांचीच मुख्य लिफाफा (दरपत्रक) नं.२ उघडण्यात येईल.

**इ) दरपत्रक दाखल करणे/निविदा उघडणे/दरपत्रक याबाबतचा तपशिल:-**

| | | |
|---|---|---|
| १. | दरपत्रक मागविण्याचा दिनांक | दिनांक २/९/२०२२ ते १३/९/२०२२ |
| २. | दरपत्रक दाखल करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक १३/९/२०२२ सायं. १६.०० वाजेपर्यंत |
| ३ | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | तांत्रिक निविदा- दिनांक १४/९/२०२२, सकाळी ११.०० वा.<br>मुख्य निविदा (दरपत्रक) - दिनांक १४/९/२०२२<br>दुपारी १२.०० वा.<br>ज्यांची तांत्रिक निविदा अहर्ता प्राप्त करील त्यांचीच मुख्य निविदा उघडण्यात येईल. |
| ४ | दरपत्रक उघडण्याचे ठिकाण | पोलीस अधीक्षक सातारा यांचे कार्यालय |
| ५ | संपर्क अधिकारी | श्री. ए.टी माने व.श्रे.लिपीक नोंदणी शाखा, पोलीस अधीक्षक, सातारा कार्यालय<br>दूरध्वनी क्र. |

कोणत्याही कारणास्तव उशिरा प्राप्त होणा-या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. प्रस्तावित वार्षिक देखभाल व दुरुस्ती करारासंबंधी काही शंका असल्यास त्याच्या निराकरणासाठी पोलीस अधीक्षक सातारा यांचे कार्यालयात उपरोक्त नमुद केलेल्या संपर्क अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

ठिकाण :- सातारा
दिनांक :- ३०/८/२०२०

**( सजन विठोबा हंकारे )**
पोलीस उप-अधीक्षक(मुख्या) सातारा